**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १**

मी ईश्वराला स्मरुन शपथ घेते की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

माझे नाव : अनिता बाळा सिनलकर,
वय : ४९ वर्षे, व्यवसाय : शिक्षिका,
राहणार : रानमळा, ता. आंबेगाव, जि. पुणे.

**<u>सरतपास : अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. पी. एस. वाळके.</u>**

१. घटना दि.१८/०९/२०२३ रोजी घडली होती. त्या दिवशी माझे पती बाळा सोनबा सिनलकर हे भिमाशंकर विद्यामंदीर, शिनोली या शाळेतुन दुचाकी नं.एम.एच.१४ डी. पी. ०९८२ वरुन घरी येत होते. ते धामणी बाजुकडून लोणीबाजूकडे येत होते. त्या रस्त्यावर कौटकर वस्तीजवळ स्वराली एक्वॉजवळ एक पांढ-या रंगाची व्हेगनार गाडी एम. एच.०४ ए.वाय.०७६८ ही लोणी बाजुकडून धामणीकडे येत होती. त्यावेळी माझे पती डाव्या बाजुने जात होते. ती गाडी समोरुन आली व ओव्हरटेक करतांना माझ्या पतीच्या गाडीला तीने धडक दिली. माझे पती संध्याकाळी ७.०० वाजले तरी घरी आले नाही म्हणुन माझ्या मुलीने त्यांना फोन केला. त्यावेळी तो फोन संदीप पाटील यांनी उचलला व त्यांनी अपघाताबाबत सांगितले.

२. त्यानंतर मी व माझी मुलगी दुचाकीवरुन लोणी गावात आलो. अपघातास्थळी गर्दी जमली होती. त्या ठिकाणी पाहिले असता माझ्या पतीच्या डोक्याला, हाताला व पायाला लागले होते. त्यांच्या डोक्यातुन रक्त येत होते व ते रस्त्यावर बेशुध्द अवस्थेत पडले होते. त्यानंतर रुग्णवाहिका बोलवली. आम्ही त्यांना पारगाव येथील आधार हॉस्पिटलमध्ये घेऊन आलो. आधार हॉस्पिटलमध्ये सीटी स्कॅनची सोय नसल्याने आम्ही त्यांना मंचर येथील मॅक्स केअर हॉस्पिटलमध्ये घेऊन आलो. तेथे त्यांच्यावर काही उपचार झाले. त्यानंतर त्यांना मोशी येथील अकॉर्ड हॉस्पिटल येथे नेले. तेथे त्यांचे सीटी स्कॅन केले. त्यांच्या डोक्याला मार लागल्याने मेंदुमधून रक्तस्त्राव होत होता. तेथे त्यांना एक रात्र एडमीट केले होते. त्यानंतर पुढील उपचाराकरीता दि.१९/०९/२०२३ रोजी त्यांना पुना हॉस्पिटल येथे नेले. आरोपीच्या हलगर्जीपणामुळे, चुकीच्या साईडने ओव्हरटेक केल्यामुळे माझ्या पतीचा अपघात झाला म्हणुन मी आरोपीविरुध्द पारगाव कारखाना पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली.

३. आरोपीचे नाव आम्हाला नंतर समजले. आरोपीचे शहाजी किसन घाडगे असे आहे. आता मला दि.०२/१०/२०२३ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१२** देण्यात येते. आता मला दि.०२/१०/२०२३ रोजीची छापिल फिर्याद दाखविण्यात आली. ती तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१३** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपी व आरोपीतर्फे वकील गैरहजर सबब उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**.

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**
**( स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव,**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि.२९/१०/२०२५**
**घोडेगाव**